**जहालमतवाद्यांच्या उदयाची कारणे -**

**१) दुष्काळाबाबत सरकारची निष्क्रिता** - ब्रिटिश राजवटीत भारतातील भिन्न प्रांतात वारंवार दुष्काळ पडले. डब्ल्यू. एस. लिली या लेखकाने 'India & its Problems' या ग्रंथात इ.स. १८५१ ते १८७५ या काळात दुष्काळात ५० लक्ष तर १८७६ ते १९०० या काळात दुष्काळात २ कोटी ५० लक्ष लोक मृत्यू पावले अशी आकडेवारी दिली आहे. ब्रिटिश अधिकारी या दुष्काळाच्या काळातही शेतकऱ्यांकडून शेतसारा गोळा करत. उपासमारीकडे सरकारने दुर्लक्ष केले. सरकारची दुष्काळ निवारण यंत्रणा ही निष्क्रिय होती. भयंकर स्वरूपाच्या दुष्काळाकडे सरकाने दुर्लक्ष केल्याने तरुण संतप्त होऊन जहालवादी विचारांकडे आकर्षिले गेले.

**२) प्लेगच्या साथीकडे सरकारचे दुर्लक्ष** - १८९६-९७ च्या दुष्काळाबरोबर महाराष्ट्रात प्लेगची साथ आली. रँडची नेमणूक प्लेग कमिशनर म्हणून केली होती. गोरे सैनिक प्लेगचे जंतू नष्ट करण्याच्या नावाखाली घराघरात घुसून स्त्रियांची बेअब्रू करणे, देवघरात प्रवेश करणे, सामानाची नासधूस करणे इ. प्रकार करत. या प्लेगच्या साथीत लक्षावधी लोक मृत्यू पावले. ब्रिटिश सरकार व अधिकाऱ्यांची प्लेग प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची प्रतिक्रिया म्हणूनच पुणे शहरात चाफेकर बंधूंनी २२ जुलै १८९७ रोजी प्लेग कमिशनर रँड व ॲम्हर्स्ट या दोघांची हत्या केली होती.

**३) काँग्रेसचे ध्येयधोरण व कार्यपद्धतीवर जहाल गटाची नाराजी** - मवाळ नेत्यांनी काँग्रेसच्या व्यासपीठावरून तसेच सार्वजनिक सभांतून ब्रिटिश सरकारवरची निष्ठा वारंवार व्यक्त केली होती. त्यांनी स्वराज्य कधीच मागितले नव्हते. व्यक्तिगत त्याग, बलिदान करण्याची त्यांना गरज वाटत नव्हती. इंग्लंड व भारत यांचे नाते अतुट आहे असे त्यांना वाटत होते. या पार्श्वभूमीवर जहाल गट काँग्रेसवर नाराज होता. "काँग्रेस म्हणजे सतत भुंकणारे पण चावा घेण्यास कचरणारे कुत्रे" अशी टीका काँग्रेसवर केली गेली. काँग्रेसचे तीन दिवसांचे अधिवेशन म्हणजे एक प्रकारचा तमाशा आहे, त्यातून काहीही साध्य होणार नाही. ब्रिटिश सरकारकडे अर्ज, विनंत्या, निवेदने व शिष्टमंडळे पाठवून काही उपयोग नाही. राजकीय हक्क आपोआप मिळत नसतात तर त्यासाठी लढा द्यावाच लागतो असे जहाल तरुणांना वाटू लागले. काँग्रेसच्या एकूण कार्यपद्धतीवर नाराजी व अविश्वास असलेला जहाल तरुणांचा गट १८९५ नंतर सक्रिय झाला.

**४) लॉर्ड कर्झनचे अंतर्गत धोरण** - इ. स. १८९९-१९०५ या काळात लॉर्ड कर्झन ही महत्त्वाकांक्षी, साम्राज्यवादी विचाराची व्यक्ती व्हाईसरॉयपदी होती. त्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारावर आघात करणारे निर्णय घेतले. १८९९

Scanned with OKEN Scanner

च्या कलकत्ता कार्पोरेशन बिलानुसार कार्पोरेशनच्या सभासदांची संख्या ७५ वरून ५० केली व त्यातही सरकारी सभासदांच्या संख्येत वाढ केली. १९०४ च्या विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाच्या कारभारावरही शासकीय नियंत्रण प्रस्थापित केले. लोकमताची पर्वा न करता त्याने बंगालच्या फाळणीचा निर्णय घेतला. भारतीयांना तुच्छ लेखणारी विधाने त्याने जाहीरपणे व्यक्त केली. कर्झन म्हणत असे की, "राष्ट्रीय सभा व राष्ट्रीयत्व यांचा शांतपणे मृत्यू घडून येईल." परंतु कर्झनची ही भविष्यवाणी खोटी ठरली. कर्झनच्या एकूण धोरणामुळे निष्क्रिय राष्ट्रीय सभा सक्रिय झाली व राष्ट्रीयत्व वाढही भारतात कर्झनच्याच काळात खूप जोमाने झाली. कर्झनच्या एकतंत्री व अनियंत्रित राजवटीची तुलना टिळकांनी औरंगजेबाच्या राजवटीशी केली होती. बंगालच्या फाळणीचा निर्णयही त्याने घेतला होता. राष्ट्रवादाची भावना दडपून टाकणे हाच त्यामागचा हेतू होता. कर्झनच्या या एकूण धोरणामुळे जहालमतवाद्यांचा उदय होण्यास मदत झाली.

**५) इंग्रजांचा वंशश्रेष्ठत्वाचा अहंकार** - इंग्रज लोक स्वत:ला वांशिकदृष्ट्या श्रेष्ठ समजत व हिंदी जनतेशी उद्दामपणे वागत. ब्रिटिशांचा धर्म व संस्कृती ही भारतीयांपेक्षा श्रेष्ठ आहे अशी त्यांची समजूत होती. भारतीय व ब्रिटिश या दोघांनी केलेल्या समान गुन्ह्याबद्दल शिक्षा मात्र समान नव्हती. दक्षिण आफ्रिकेत मजुरी व व्यापारासाठी गेलेल्या भारतीय लोकांना भयंकर वर्णद्वेषाला तोंड द्यावे लागे. ठराविक शाळा, हॉस्पिटल, हॉटेल व रेल्वेचा प्रथमश्रेणीचा डब्बा येथे भारतीयांना प्रवेश नव्हता. कर्झनने तर भारतीय लोक वंशाने व संस्कृतीने कनिष्ठ आहेत; त्यांना लोकशाहीचे अधिकार देऊन नयेत अशी जाहीर विधाने केली होती. भारतीय लोक उच्च पदासाठी अपात्र आहेत, उच्च पदे फक्त युरोपियन लोकांनीच उपभोगावीत अशीही जाहीर भूमिका कर्झनने घेतली होती. या वंशश्रेष्ठत्वाच्या अहंकाराचा परिणाम म्हणून काँग्रेसमधील तरुणांचा एक गट जहाल विचारांचा बनला.

**६) लॉर्ड कर्झनचे परराष्ट्र धोरण** - लॉर्ड कर्झन हा साम्राज्यवादी धोरणाचा कट्टर पुरस्कर्ता होता. त्याच्या महत्त्वाकांक्षी स्वाभावामुळेच चीन, तिबेट व अफगाणिस्तान या देशांशी तंटे निर्माण झाले होते. हे सीमा तंटे सोडवण्यासाठी त्याने भारतीय लष्कराचा उपयोग केला, एवढेच नव्हे तर युद्धाचा खर्चही भारतीयांवर लादला होता. ब्रिटिशांच्या साम्राज्यविस्तारासाठी भारतीयांना रक्त सांडावे लागणे व करांचा बोजा सहन करावे लागणे ही बाब जहाल तरुणांना आवडली नाही.

**७) लॉर्ड लिटन, लॉर्ड लेन्सडाऊन व लॉर्ड एल्गीन यांची दडपशाहीची धोरणे** - लॉर्ड लिटनने वृत्तपत्र स्वातंत्र्यावर निर्बंध घालणारा कायदा पास केला होता. तसेच शस्त्रबंदी कायदा पास करून भारतीयांना शस्त्र बाळगण्यास बंदी केली होती.

Scanned with OKEN Scanner

भारतीयांची दडपशाही करण्याची ही परंपरा पुढील व्हाईसरॉयनी पुढे चालविली. लॉर्ड लेन्सडाऊनने दडपशाहीचा उच्चांक केला. त्याने भारतीयांना शासकीय नोकरीत सामावून घेण्याचे नाकारले. त्याने आयकर पुन्हा लागू केला. मिठावरील करात वाढ केली. **लॉर्ड एल्गीनने** तर म्हटले होते, "आम्ही आमच्या शस्त्राच्या जोरावर भारताला जिंकून घेतले आहे व तो शस्त्रसामर्थ्याच्या जोरावरच ताब्यात ठेवू." लॉर्ड एल्गीनच्या काळात (१८९४-९८) दुष्काळ, रोगराई व उपासमार इ. प्रश्न गंभीर बनले होते. पण त्या प्रश्नांकडे त्याने दुर्लक्ष केले.

**८) आंतरराष्ट्रीय घटनांचा जहाल राष्ट्रवाद्यांवर पडलेला प्रभाव** - वसाहतवादविरोधी जे लढे किंवा देशाच्या ऐक्यासाठी जे लढे जगात त्या काळात लढले गेले त्याचा प्रभाव भारतातील जहाल राष्ट्रवाद्यांवर पडणे साहजिकच होते. इटाली या देशात जोसेफ मॅझिनी, काऊंट काव्हूर व गॅरिबाल्डी या तिघांच्या नेतृत्वाखाली एकीकरणाची चळवळ झाली. जर्मनीचेही एकीकरण बिस्मार्कच्या नेतृत्वाखाली पूर्ण झाले. इजिप्त, इराण, तुर्कस्तान या देशातही नवसमाजाच्या निर्मितीसाठी चळवळी झाल्या. चीनमध्ये पाश्चात्त्यांच्या वर्चस्वाविरुद्ध बक्सारचा उठाव झाला. आर्यलंडमध्ये ब्रिटिशविरोधी चळवळ झाली, तर आफ्रिकेतील ॲबिसिनियानांनी १८९१ ला इटालीचा पराभव केला. १९०५ साली चिमुकल्या जपानने खंडप्राय रशियाचा पराभव केला. युरोपियन राष्ट्रे अजिंक्य आहेत; आशियाची राष्ट्रे मागास आहेत या कल्पनेला त्यामुळे तडा गेला. प्रस्तुत सर्व आंतरराष्ट्रीय नमूद घटनांचा परिणाम म्हणून जहाल विचारसरणीला भारतात गती प्राप्त झाली.

**९) आर्थिक शोषणाची तीव्र जाणीव** - ब्रिटिश भारतीयांचे जे आर्थिक शोषण करत त्या संदर्भात दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, दिनशॉ वाच्छा वगैरेंनी अभ्यासपूर्ण लिखाण केले होते. इंग्लंडमधून आयात होणाऱ्या वस्तूवरचा जकात कर त्यांनी माफ केला होता. भारतातून कच्चा माल ते अत्यंत कमी किमतीला खरेदी करत व पक्का माल भारतीय बाजारपेठेत जास्त किमतीला विकत. ब्रिटिशांनी देशी उद्योगांना संरक्षण दिले नाही. त्यांच्याच धोरणामुळे देशी उद्योग व्यवसाय बंद पडून बेकारीत भर पडली. काही ब्रिटिश भांडवलदारांनी चहा, कॉफी, नीळ, रबर या वस्तूंच्या उत्पादनात भांडवल गुंतवले होते. या उत्पादनात जे भारतीय मजूर होते त्यांचे प्रचंड शोषण केले जाई. भारतीयांवरील करांचा बोजाही प्रचंड होता. या आर्थिक शोषणाच्या एकूण पार्श्वभूमीवर ब्रिटिश सत्तेबद्दल तरुणांच्या मनात चीड व संताप निर्माण झाला. आर्थिक शोषणाची तीव्र जाणीव त्यांच्यात निर्माण झाली. म्हणूनच जहालांनी स्वदेशी व विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकण्याचा कार्यक्रम घोषित केला होता.

Scanned with OKEN Scanner

**१०) १८९२ च्या कायद्याने केलेला अपेक्षाभंग** - या कायद्यानुसार केंद्रीय व प्रांतीय मंत्रिमंडळातील बिनसरकारी सदस्यांच्या (भारतीयांच्या) संख्येत वाढ करून त्यांना हक्कही दिले होते. परंतु त्या संदर्भात ब्रिटिश ग. ज. लाच जास्त अधिकार असल्याने या कायद्याचा फोलपणा भारतीयांच्या लक्षात आला. अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा अधिकार होता, पण मतदान करण्याचा अधिकार नव्हता. हिंदी सभासद हे दोन्ही कायदेमंळात अल्पमतात होते. पंजाब प्रांताला केंद्रीय कायदेमंडळात स्थान दिले गेले नव्हते. भारतातील भिन्न वर्गांना व हितसंबंधांना प्रतिनिधित्व देण्याची तरतूद ही राष्ट्रहिताला हानिकारक होती. या दोषांच्या पार्श्वभूमीवर **उमेशचंद्र बॅनर्जी** यांनी म्हटले, ''या कायद्याने भारतीयांच्या पदरात काहीही पडणार नाही आणि म्हणून आपले न्याय्य अधिकार मिळेपर्यंत आपण आपली चळवळ अविरतपणे चालू ठेवावी.'' या कायद्यातील तरतुदींमुळे जहाल गटाचा अपेक्षाभंग झाला होता. **टिळकांनी म्हटले** की, ''राजकीय हक्कांबाबत आपण लढाच दिला पाहिजे. काँग्रेसमधील मवाळांना वाटते की, राज्यकर्त्यांचे हृदयपरिवर्तन करून आणि राजकीय हक्क प्राप्त करून राज्यकर्त्यांवर दबाव आणल्याशिवाय हक्क मिळत नसतात.

**११) हिंदू धर्म व संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाची चळवळ** - या चळवळीचे नेतृत्व स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, टिळक, रवींद्रनाथ टागोर, लाला लजपतराय, अरविंद घोष इ. व्यक्तींनी केले. हिंदी राष्ट्रवाद हा हिंदू संस्कृतीचेच एक अंग आहे असे या सर्वांना वाटत होते. प्राचीन भारतीय धर्म, संस्कृती, तत्त्वज्ञान इ. क्षेत्रातील भारतीयांचा वारसा या मंडळींनी भारतीयांपुढे मांडून त्यांना जागृत केले. पाश्चात्त्य संस्कृती व धर्मापेक्षा भारतीय संस्कृती व धर्म श्रेष्ठ आहे असा त्यांचा युक्तिवाद होता. हिंदी तरुणांनी शिवाजी महाराज, तात्या टोपे, झाशीची राणी, महाराणा प्रताप यांच्यापासून प्रेरणा घेतली. स्वा. सावरकरांनी लिहिलेल्या 'भारतीय इतिहासाची सहा सोनेरी पाने' व '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथांनीही जहाल राष्ट्रवादाच्या निर्मितीस खतपाणी घातले. बंगालमध्ये कालीची तर महाराष्ट्रात गणपतीची लोक उपासना करू लागले. आर्य समाज, रामकृष्ण मिशन, थिऑसॉफिकल सोसायटीने सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या चळवळीस गती दिली. या सर्व व्यक्ती व संस्था यांचे लिखाण, विचार व प्रयत्न यांचा परिणाम म्हणून जहाल राष्ट्रवादास गती प्राप्त झाली.

**१२) बंगालची फाळणी (१९०५)** - जहाल राष्ट्रवादाच्या निर्मितीचे हे महत्त्वाचे कारण आहे. बंगाल प्रांताचा प्रचंड आकार, लोकसंख्या व प्रशासकीय सोय ही कारणे पुढे करून कर्झनने बंगालची फाळणी केली असली तरी त्यामागचा खरा हेतू

Scanned with OKEN Scanner

## लोकमान्य टिळक यांचे कार्य

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात टिळकांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रसिद्ध चरित्रलेखक **धनंजय कीर** म्हणतात, "गेल्या ३०० वर्षात भारतभर गुलामगिरीचे संकट ओढले असता जनतेला स्वातंत्र्याचा व स्वराज्याचा मंत्र देणारे दोन महापुरुष होऊन गेले. त्यामध्ये एक शिवाजी महाराज व दुसरे टिळक. **माऊंटबॅटन यांनी** टिळकांच्या समकालीनात टिळकाएवढा दुसरा प्रभावी पुढारी नव्हता असे म्हटले होते. 'टिळक हे भारतातील महान लोकनेता होते' असे **लेनिन** यांनी म्हटले आहे. **म. गांधींच्या मते,** "टिळकांचा मी शिष्य आहे असा माझा दावा नाही. टिळकांची प्रखर इच्छाशक्ती, सखोल अभ्यास, प्रखर देशभक्ती, त्याग आणि युद्धजीवन हे गुण वाखाणण्यासारखे आहेत. जनतेचे ते प्रभावी नेते होते. त्यांनीच आमच्यात स्वातंत्र्याची भावना निर्माण केली. तत्कालीन सरकारचे दोष टिळकांएवढे कोणीच दाखवू शकले नाहीत. टिळकांनीच भारतीय जनतेला स्वातंत्र्याचा मार्ग दाखवला. **भालबा केळकर** यांनी 'टिळक विचार' या ग्रंथात म्हटले, "भारतातील राजकारणात लोकयुग निर्माण करण्याचे कार्य टिळकांनी आपल्या विचार प्रतिपादनातून व राजकीय आंदोलनातून केले. ते राजकारणातील लोकयुगाचे निर्माते आहेत." राजकारणात वैचारिकदृष्ट्या टिळकांचे प्रतिस्पर्धी **ना. गोखले** यांनी म्हटले, "टिळक पेशवाईत जन्मास आले असते तर त्यांनी स्वतंत्र राज्यच स्थापन केले असते."

टिळकांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी येथे झाला. १८७२ साली मॅट्रिक, १८७७ ला बी. ए. व १८७९ ला एलएल. बी. चे शिक्षण त्यांनी पूर्ण केले. शिक्षणसंस्था व वृत्तपत्रे या माध्यमातून टिळकांनी सार्वजनिक जीवनाला प्रारंभ केला होता.

**१) टिळकांचा 'केसरी'** - १८८० साली 'केसरी' हे मराठी साप्ताहिक व 'मराठा' हे इंग्रजी साप्ताहिक सुरू झाले. न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना करणारी मंडळीच या वृत्तपत्रांच्या संपादक मंडळात होती. प्रारंभीच्या काळात टिळक धर्मशास्त्र व कायदा या विषयावर लेख लिहीत. १८८२ च्या प्रारंभी 'केसरी' चा खप १८०० प्रती होता तर १८९२ मध्ये तो १३००० प्रती एवढा होता. १८८८ पासून टिळक 'केसरी' चे संपादक म्हणून नियमितपणे लिखाण करू लागले. हळूहळू 'केसरी' हे लोकपत्र बनले. टिळकांनी लोकांवरील अन्याय, जुलूम, राज्यकर्त्यांचे जुलमी कायदे व कृत्ये ही सतत केसरीत मांडून लोकमत अनुकूल करून घेतले. टिळक व ब्रिटिश नोकरशाहीचे युद्ध शेवटपर्यंत चालले होते. नोकरशाहीवर टीका करणे हा राजद्रोह ठरत नाही अशी टिळकंची भूमिका होती. टिळकंनी ब्रिटिशांचे आर्थिक धोरण,

Scanned with OKEN Scanner

जहालांची चतु:सूत्री व सामाजिक प्रश्नांवर केसरीत विपुल लिखाण केले. भारतीय राष्ट्रवादाचे तत्त्वचिंतन करणारे अनेक लेख त्यांनी 'केसरी'तून लिहिले. टिळकांचा 'केसरी' ही एक महान शक्तीच होती.

**२) शैक्षणिक कार्य :** १ जानेवारी १८८० ला पुणे येथे टिळकांनी 'न्यू इंग्लिश स्कूल' स्थापन केले. पुढे काही सहकाऱ्यांच्या साहाय्याने त्यांनी (Decan Education Sociaty) ची स्थापना केली. या संस्थाच्या वतीने १८८५ ला पुणे येथे 'फर्ग्युसन कॉलेज' सुरू करण्यात आले. टिळक गणित व संस्कृत या विषयाचे अध्यापन करत. टिळकांना Deccan Education Society चे अध्यक्षपद हवे होते. पण टिळक अल्पमतात होते. त्यांचे आगरकरांशी मतभेद होते. शेवटी टिळक १८८८ ला या दोन्ही संस्थांचे त्यागपत्र देऊन बाहेर पडले. डॉ. य. दि. फडके यांनी 'शोध.बाळगोपाळांचा' या ग्रंथात या संबंधीचा विस्तृत अभ्यास केला आहे. टिळक संस्थेतून गेले याचे दु:ख कोणासही झाले नाही.

**३) टिळकांचा तुरुंगवास** - टिळकांना अनेकदा तुरुंगात जावे लागले. कोल्हापूर संस्थानाचे दिवाण बर्वे यांच्याविरुद्ध केलेल्या वृत्तपत्रीय लिखाणामुळे टिळक-आगरकरांवर खटल चालला. ते दोघे साडेतीन महिने तुरुंगात होते. 'डोंगरीच्या तुरुंगातील आमचे १०१ दिवस' हा ग्रंथ त्यांनी तेथे लिहिला. १८९६-९७ मध्ये महाराष्ट्रात दुष्काळ व प्लेगची साथ यांनी थैमान घातले. सरकारचे दुष्काळाकडे पूर्णपणे दुर्लक्ष होते. प्लेग निवारणाच्या नावाखाली पुण्यातील नागरिकांना ब्रिटिश सरकारने त्रास दिला होता. या पार्श्वभूमीवर प्लेग कमिशनर रँड व त्याचा सहकारी ॲम्हर्स्ट यांचा खून चाफेकर बंधूंनी केला. टिळकांनी केसरीतून अत्यंत जहाल स्वरूपाची टीका ब्रिटिश सरकारवर केली. रँडच्या हत्येला उत्तेजन दिले म्हणून ब्रिटिशांनी टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरला. तेव्हा त्यांना ६ वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली. टिळकांना शिक्षा झाल्याचे ऐकून अनेकांना रडू आले. शिक्षेच्या प्रत्येक वर्षाला एक याप्रमाणे ६ दिवस कामगारांनी हरताळ पाळला होता. मुंबईतील ८५ गिरण्यातील १ लक्ष कामगारांना टिळकांबद्दल आदर होता. मुंबई शहर व भारतातील इतर प्रंतातूनही टिळकांच्या शिक्षेची तीव्र प्रतिक्रिया उमटली होती. **लेनिन म्हणतो की,** ``This was first political action of Indian working class." १९१४ पर्यंत टिळक हे ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात होते. ते तुरुंगातून सुटून आले तेव्हा संपूर्ण भारतात एक उत्साह, नवे वारे निर्माण झाले. मुंबई इलाख्याचे नव्हे तर अ. भा. स्तरावर त्यांचे नेतृत्व पोहोचले. म. गांधींच्याआधी फक्त टिळकांनाच अखिल भारतीय लोकप्रियता मिळाली होती. म्हणूनच **धनंजय कीर** यांनी म्हटले, "जनता व राजकारण यांना एकत्र जोडणारा टिळक हा भारतातीलच नव्हे तर आशिया खंडातील एकमेव नेता होय."

Scanned with OKEN Scanner

**४) टिळक गणशोत्सव व शिवजयंती** - १८९३ साली टिळकांनी गणशोत्सव सुरू केला. धर्म व संस्कृतीच्या आधारे राष्ट्रवाद निर्माण करण्याचा प्रयत्न टिळकांनी केला. हिंदूत एकता निर्माण करण्यासाठी टिळकांनी गणपती उत्सवाला सामाजिक स्वरूप प्राप्त करून दिले. सर्व जाती या उत्सवात भाग घेऊ लागल्या. त्यामुळे जनजागृती व सामाजिक ऐक्य प्रस्थापित होण्यास मदत होईल असे टिळकांना वाटत होते. टिळकांना स्वसंस्कृती व धर्माबद्धलचा अभिमान अशा उत्सवातून वाढीस लागेल असे वाटत होते. गणपती उत्सवामागे ब्रिटिशांचे राज्य उलथवून टाकणे ही प्रेरणा होती. गणराज्य देणारा गणपती म्हणजे स्वतंत्र देवता आहे असे टिळक सांगत असत.

१८९६ मध्ये टिळकांनी रायगड येथे असलेल्या शिवसमाधीच्या जीर्णोध्दाराची चळवळ हाती घेतली. रायगडावर त्यांनीच प्रथम शिवजयंती साजरी केली. शिवाजी महाराज हे शौर्य, धैर्य, राष्ट्रप्रेम यांचे प्रतीक होते. त्यांनी अन्याय, जुलूम व अत्याचाराविरुद्ध लढा दिला होता. त्यांचे कार्य एका जातीपुरते नव्हते म्हणून महाराष्ट्रातील विविध जातींचे प्रेम एकाच ठिकाणी बसण्याचे स्थळ म्हणजे शिवचरित्र होय असा विचार टिळकांनी मांडला. महान पुरुषांचे स्मरण हे राष्ट्रीयत्व कायम ठेवण्याचे एक चांगले साधन आहे असे टिळक म्हणत. १९०६ सालच्या शिवाजी उत्सवासाठी टिळकांना कलकत्ता येथे निमंत्रित करण्यात आले होते. तेथे त्यांचे प्रचंड प्रमाणात उत्स्फूर्त स्वागत झाले होते. कलकत्ता येथील त्यांच्या सभेत काही मुस्लिम नेत्यांचीही भाषणे झाली होती. टिळकांनी तेथील सभेत शिवाजी महाराज हे इस्लामविरोधी होते हा ब्रिटिशांनी केलला खोडसाळ अपप्रचार आहे हे सांगितले. राष्ट्रीय सभेच्या हातून जी कामगिरी बजावणे अशक्य आहे ती कामगिरी या दोन महोत्सवांच्याद्वारे सुशिक्षित लोक सहज बजावू शकतील अशी टिळकांना खात्री होती.

**५) टिळक व पुणे सार्वजनिक सभा** - पुणे सार्वजनिक सभा ही मवाळ सुधारणावाद्यांच्या हातात २५ वर्षांपासून होती. टिळकांनी १८९५ मध्ये या सभेची सूत्रे हाती घेतली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी कृतीप्रवण राजकीय चळवळीस प्रारंभ केला होता. या संस्थेच्या कार्यकर्त्यांना खेडोपाडी पाठवून त्यांच्यामार्फत सरकारने केलेल्या Famine Relief Code नुसार शेतकऱ्यांना मिळावयाच्या सवलतीची त्यांना माहिती करून दिली. या उपक्रमामुळे पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांत जागृती निर्माण झाली होती.

**६) ब्रिटिश राजवटीचे टिळकांनी दाखविलेले दोष** - ब्रिटिशांनी व्यक्तिस्वातंत्र्याची मुस्कटदाबी केल्यामुळे आपण सत्त्वहीन, बलहीन होत चाललो आहोत याचा दोष ते ब्रिटिशांना देतात. भारतीयांच्या मानसिक दुर्बलतेला ब्रिटिशच जबाबदार आहेत अशी

Scanned with OKEN Scanner

त्यांची खात्री होती. अवाढव्य लष्करी खर्चावरही टिळकांनी टीका केली होती. सर्व जहाल नेत्यांत टिळकांनीच ब्रिटिश भारताचे करत असलेल्या आर्थिक शोषणावर हल्ला केला होता. या संदर्भात त्यांचे ब्रिटिश सरकारवर पुढील आक्षेप होते - १) आमचे उद्योगधंदे ठार केले. २) महसुलाचा आकार प्रचंड आहे. ३) पाटबंधाऱ्याच्या कामावर सरकार हवा तेवढा खर्च करत नाही. ४) जमीन मालकीचा शेतकऱ्यांचा हक्क सरकार हिरावून घेत आहे. ५) शेतकऱ्यांच्या वाईट स्थितीला सरकार जबाबदार आहे. ६) सर्वच सरकारी खात्यांनी जनतेचे शोषण चालविले आहे.

**७) टिळकांची चतु:सूत्री** - अगदी प्रारंभीच्या काळात टिळकांचाही नेमस्तांच्या मार्गावर विश्वास होता. पण तो उडाला. त्यांनी स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चार सूत्रांचा वापर राष्ट्रीय चळवळीसाठी केला.

**१) स्वराज्य** - 'स्वराज्य' व 'सुराज्य' या दोन कल्पनातील फरक टिळकांनी स्पष्ट केला होता. स्वराज्य म्हणजे आपले राज्य प्रजेच्या प्रतिनिधीमार्फत चालणारे राज्य. टिळकांच्या व्याख्येनुसार ब्रिटिशांच्या राज्यास स्वराज्य कधीच म्हणता येणार नाही. कारण त्यात राज्यकर्ते परधर्मी व परदेशी आहेत. त्यांचे हितसंबंध त्यांच्या स्वत:च्या देशात गुंतलेले आहेत. स्वराज्याचा 'प्रजासत्ताक राज्य' हा अर्थ त्यांनी लोकांच्या मनावर बिंबविला. **टिळक म्हणतात** , "नैतिक व अध्यात्मिक विकास होण्यासाठी अनुकूल परिस्थिती फक्त स्वराज्यातच असते. स्वराज्य हे धार्मिक व नैतिकदृष्ट्या आवश्यक आहे." धर्माच्या आधारे राष्ट्रवाद निर्माण करण्याचा प्रयत्न टिळकांचा होता. धर्म एकात्मता निर्माण करतो म्हणून धर्माकडे राष्ट्र निर्माण करण्याचा एक घटक म्हणून त्यांनी पाहिले. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवणारच" असे टिळकांनी म्हटले होते. टिळकांनी स्वदेशीची कल्पना लोकप्रिय करून तिला चळवळीचे रूप दिले.

**२) स्वदेशी** - नौरोजी, रमेशचंद्र दत्त, म. गो. रानडे इ. नी मांडलेल्या आर्थिक शोषणाचे सूत्रच घेऊन टिळकांनी भारताच्या आर्थिक अवनतीसंबंधी लिखाण केले. स्वदेशीच्या बाबत सुशिक्षित पांढरपेशा वर्गाची जबाबदारी मोठी आहे असे त्यांना वाटे. देशाच्या कल्याणासाठी देशी कपड्याचा वापर करा असा आग्रह त्यांनी धरला. वर्तमानपत्रे, सभा, संमेलन भरवून स्वदेशीचा तुफान प्रचार त्यांनी केला. बंगालच्या फाळणीचा निषेध, कपड्यांची होळी त्यांनी केली. स्वदेशीमुळे खेड्यातील उद्योगांना संरक्षण मिळेल असे ते म्हणत. राजकीय, औद्योगिक, सामाजिक, नैतिक व सांपत्तिक या सर्वच दृष्टीने स्वदेशीच्या चळवळीची आवश्यकता आहे असे टिळक म्हणत. विदेशी माल घेतल्याने ग्राहकांचे व पर्यायाने देशाचेही नुकसान होते म्हणून स्वदेशी वस्तूंच्या वापराचा त्यांनी आग्रह धरला.

Scanned with OKEN Scanner

युप्त शिक्षावर त्यांचा ... ... ... ...
त्यांनी विचारमंथन केले होते. १९२० साली मुंबईच्या एम्पायर थिएटरमध्ये झालेल्या अ. भा. मजूर परिषदेच्या पहिल्या बैठकीचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. भाषणात लाला लजपतराय यांनी म्हटले होते, "भांडवलशाहीने आज १५० वर्षे जगावर आपली सत्ता गाजविली आहे. लष्करशाही व साम्राज्यशाही ही भांडवलशाहीचीच आसुरी मुले आहेत. तिन्हीही सारखीच हिंसक आहेत. अलीकडे 'ट्रेड युनियन' हा त्यांच्यावर एक तोडगा सापडला आहे." एक ना एक दिवस कामगार चळवळ आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण करेल याबद्दल त्यांना शंका नव्हती. १९२६ मध्ये लंडन येथे भरलेल्या जागतिक मजूर परिषदेला भारतीय मजूर संघाचे प्रतिनिधी म्हणून ते हजर होते. मृत्यूपूर्वी त्यांनी आपली सर्व मालमत्ता देशाला अर्पण केली होती. **प. नेहरूंनी म्हटले होते,** "लालजींच्या निधनामुळे देशाचे अपरिमित नुकसान झाले आहे. या देशाच्या सार्वजनिक जीवनात निर्माण झालेली पोकळी नजीकच्या काळात भरून येणे कठीण आहे."

**बिपिनचंद्र पाल (१८५८ ते १९३२) -** ७ नोव्हेंबर १८५८ रोजी बंगाल प्रांतातील सिल्हेट जिल्ह्यात त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील न्यायाधीशाकडे पेशकार होते. आपल्या मुलाने इंग्रजी शिकावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. शिक्षणासाठी ते कलकत्ता शहरी आले. ब्राह्मो समाजाकडे ते आकर्षिले गेले व ब्राह्मो समाजाची त्यांनी दीक्षा घेतली. परंतु त्यांच्या वडिलांना हा निर्णय आवडला नाही. त्यामुळे पुढील शिक्षण त्यांना आर्थिक हलाखीतच पूर्ण करावे लागले. पुढे ओरिसात कटक या शहरी व दक्षिणेत बंगलोर शहरी ते काही काळ मुख्याध्यापक होते. पण संस्थाचालकाशी बेबनाव झाल्याने ते आजन्म वृत्तपत्र व्यवसायात राहिले. प्रारंभी १८८० ला त्यांनी 'परिदर्शक' या नावाचे एक बंगाली साप्ताहिक काढले. त्यानंर त्यांनी Bengal Publicity Opinion, The Tribun, New India, Independend ही वृत्तपत्रे बदलली.

प्रारंभीच्या काळात ते नेमस्तवादी होते. तेही इंग्रजी राजवटीला ईश्वरी वरदान समजत. परंतु बंगालच्या फाळणीनंतर त्यांचा नेमस्तवादावरचा विश्वास उडाला व ते जहालवादी बनले. विविध प्रांतांत फिरून त्यांनी आपल्या वक्तृत्वाद्वारे स्वदेशी, बहिष्काराचा अर्थ व नवा संदर्भ जनतेला सांगितला. १९०७ मध्ये सुरत येथे काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर टिळक वगैरे जहाल नेत्यांबरोबर तेही काँग्रेसबाहेर पडले. १९१६ मध्ये लखनौ अधिवेशनात ते पुन्हा काँग्रेसमध्ये आले. १९२१ मध्ये गांधीजींनी असहकार

Scanned with OKEN Scanner

बहिष्काराचा समावेश होता. अरविंदांचे चरित्रकार आर. एस. दिवाकर यांनी 'महायोगी श्रीअरविंद' या ग्रंथात म्हटले की, "निर्भेळ व परिपूर्ण स्वातंत्र्याचे प्रमुख व निर्भय पुरस्कर्ते अरविंद हेच होत. अरविंदांनी राष्ट्रीय चळवळीची उभारणी निधर्मी तत्त्वावर न केल्यामुळे, हिंदू धर्माच्या पायावरच चळवळ उभी करण्याचा प्रयत्न केल्यामुळे मुस्लिम जनता राष्ट्रीय प्रवाहापासून अलग झाली. मुस्लिम लीगची स्थापना होऊन राष्ट्रीय चळवळीला खीळ बसली या अरविंदांवरील आक्षेपात काही अशी सत्यांश आहे. टिळकांनी अरविंदांबद्दल म्हटले, "त्याग, ज्ञान आणि सत्याचे आकलन याबाबत अरविंदांप्रमाणे कोणीच नाही. अरविंदांसारखे लोक राष्ट्रीय कार्याकडे आकर्षित झाले ही ईश्वराचीच कृपा समजली पाहिजे."

**सुरतेची फूट (१९०७)**

१९०७ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात जहाल व मवाळ यांच्यात पडलेली फूट ही स्वातंत्र्य आंदोलनातील एक महत्त्वाची घटना आहे. अर्थात, मवाळ व जहाल यांची भिन्न विचारसरणी व कार्यपद्धती हे सुरत येथील काँग्रेस फुटीचे खरे कारण होते.

**१९०५ चे बनारसचे अधिवेशन -** १९०५ साली बनारस येथे राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन ना. गोखले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या अधिवेशनापूर्वी ना. गोखले व लाला लजपतराय यांनी इंग्लंडला जाऊन फाळणी रद्द करण्यासंबंधी ब्रिटिशांचे मत वळविण्याचा प्रयत्न केला होता. पण ती मागणी फेटाळल्याने हिंदी राजकारण तप्त बनले होते आणि त्याच पार्श्वभूमीवर हे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात फाळणीबद्दल सरकारचा निषेध करणारा ठराव पास झाला होता. फाळणी रद्द करावी अशीही मागणी एका ठरावाद्वारे केली गेली. ब्रिटिश युवराजाच्या स्वागताच्या प्रश्नावरून या अधिवेशनात जहाल व मवाळ यांच्यात मतभेद झाले होते. जहालांची इच्छा नसतानाही ठराव मंजूर झाला होता. कारण जहालांचा गट काँग्रेसमध्ये अल्पमतात होता. ना. गोखले यांचा जहालांच्या नि:शस्त्र प्रतिकार चळवळीला विरोध होता. नि:शस्त्र प्रतिकाराची चळवळ देशभर सुरू करावी असे जहालांना वाटत होते. पण त्यास मवाळांचा नकार होता. बनारसच्या या अधिवेशनातच जहाल-मवाळ यांच्यातील मतभेद स्पष्ट झाले होते. बिपिनचंद्र पाल यांनी ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकावा असा ठराव अधिवेशनात मांडला असता फिरोजशहा मेहता, दिनेश वाच्छा वगैरे मवाळ नेत्यांनी बहिष्काराचे शस्त्र फक्त बंगालपुरते वापरले जावे, संपूर्ण देशात बहिष्काराचे शस्त्र वापरू नये असे आग्रहाने मत मांडले. याच अधिवेशनात इंग्लंडच्या युवराजाच्या भारतभेटीच्या प्रश्नांवरूनही जहाल-मवाळ यांच्यात मतभेद झाले. इंग्लंडच्या युवराजाचे

Scanned with OKEN Scanner